ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ५ मार्च, १९५८ | अंक १०

## विविध माहिती

**मध्यप्रदेशांत वेअरहौसिंग कॉर्पोरेशन**— मध्यप्रदेश सरकारनें राज्यांत एक वेअरहौसिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें आधिकृत भांडवल २ कोटी रुपयांचें व वसूल भांडवल १० लाख रुपयांचे राहील. वसूल भांडवलापैकी निम्मी रक्कम राज्य सरकार व निम्मी कॉर्पोरेशन उभारणार आहे. राज्यांतील व्यापारी महत्त्वाच्या ठिकाणीं कॉर्पोरेशन गुदामें बांधणार आहे.

**पोलंडपेक्षा भारत पुढें**—पोलंडच्या अणुशक्ति कौन्सिलचे अध्यक्ष श्री. बिलिंग ह्यांनीं, अणुविषयक विज्ञानांत भारत पोलंडपेक्षा बराच पुढारलेला आहे असें मत व्यक्त केलें आहे. पोलंडमधील विद्यार्थ्यांना अणुविज्ञान शिकण्यासाठीं भारतांत पाठविण्यास पोलंडला आनंद होईल. उलट, भारताच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण देण्यास पोलंड तयार आहे, असेंहि ते म्हणाले.

**औरंगाबादमध्यें कुटुंबनियोजन केंद्र**—औरंगाबाद येथें श्रीमती शकुंतलाबाई परांजपे ह्यांच्या हस्तें एका कुटुंबनियोजन केंद्राचा उद्घाटन-समारंभ झाला. संस्थेच्या कार्यासाठीं म्युनिसिपालिटीनें इमारत भाड्यानें घेतली आहे. भारत सरकारकडून केंद्राला दरसाल १३,००० रुपये मदतीदाखल देण्यांत येणार आहेत.

**विदर्भांतील खनिजांचा शोध**—विदर्भांतील चांदा जिल्ह्यांतील खनिजांचा शोध करण्यासाठीं भूस्तरशास्त्रज्ञांतर्फे त्या जिल्ह्याची लवकरच पहाणी करण्यांत येणार आहे. ह्या भागांत कोळसा, लोखंड, शिसें, चुनखडीचा दगड व सोनें ह्या खनिजांचे मोठे साठे आहेत असें मत कांहीं तज्ज्ञांनीं व्यक्त केलेलें आहे.

**अग्निबाणांचा परतीचा प्रवास**— अंतराळांत सोडलेल्या अग्निबाणाला त्याची कक्षा सोडण्यास लावून परत पृथ्वीवर आणण्याच्या कामीं रशिअन शास्त्रज्ञांनीं यश मिळविलें असल्याची वार्ता आहे. अग्निबाण परत पृथ्वीच्या वातावरणांत शिरतांना घर्षणानें जळून जाण्याचा धोका असतो, हीच ह्या कामांतील फार मोठी अडचण समजली जाते.

**निष्कलंक पोलादाचा कारखाना**— जमशेटपूर येथील धातुसंशोधन संस्थेनें शोधून काढलेल्या नव्या प्रक्रियेचा उपयोग करून भारतांत निष्कलंक पोलाद बनविण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार सरकार करीत आहे. नव्या प्रक्रियेंत पोलाद तयार करण्यासाठी कथिलाचा वापर न करतां मँगेनीझचा वापर करण्यांत येतो.

**पश्चिम जर्मन सरकारची मदत**—असनसोन जवळील चिनकुरी ह्या कोळशाच्या खाणींत झालेल्या स्फोटांत अनेक कामगार बळी पडले. बळी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना मदत म्हणून पश्चिम जर्मन सरकारनें १०,००० मार्कची रक्कम देणगीदाखल दिली आहे. ह्या रकमेंतून जखमी कामगारांनाहि मदत देण्यांत येणार आहे.

**वेरावळ येथें आर्टस् कॉलेज**—सोमनाथ देवालयाच्या विश्वस्त समितीनें वेरावळ येथें एक आर्टस् कॉलेज काढण्याचा विचार चालविला आहे. ह्या संकल्पित कॉलेजमध्यें संस्कृत भाषेच्या अध्यापनावर विशेष भर देण्यांत येणार आहे. नवानगरचे जामसाहेब हे विश्वस्त समितीचे अध्यक्ष आहेत. सोमनाथ येथें बांधण्यांत येत असलेल्या देवळाच्या कामाच्या प्रगतीचाहि विश्वस्तांच्या बैठकींत विचार झाला.

**कॉकेशस पर्वतावर मोहीम**—रशिआंतील कॉकेशस पर्वताच्या अत्युच्च शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न ब्रिटिश गिर्यारोहकांची एक तुकडी करणार आहे. तुकडीचें नेतृत्व, १९५३ सालीं एव्हरेस्ट शिखरावर चढणाऱ्या तुकडीचे पुढारी सर जॉन हंट ह्यांच्याकडे आहे. आरोहण करण्याची परवानगी रशिआकडून मिळाली आहे.

**वेगवान् बोटींचें प्रदर्शन**—जर्मनींतील लिपझिग येथें भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनांत रशिआ एक नव्या प्रकारची बोट ठेवणार आहे. ही बोट मुख्यतः नदीवरील प्रवासासाठीं असून तिचा वेग ताशी ४६ मैलापर्यंत असेल. कांहीं नवीन प्रकारच्या रचनेमुळें ती पाण्याच्या पृष्ठभागाला अत्यल्प स्पर्श करून चालेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### १९५८-५९ चें मध्यवर्ती सरकारचें बजेट

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | बजेट १९५७–५८ | दुरुस्त १९५७–५८ | बजेट १९५८–५९ |
|---|---|---|---|
| एकूण उत्पन्न | ७०८,०३ | ७२४,६३ | ७६३,१६ |
| | | | + ५,८३ |
| एकूण खर्च | ६७२,२९ | ७१९,५८ | ७९६,०१ |
| वाढावा किंवा तूट | + ३५,७४ | + ५,०५ | – २७,०२ |

**उत्पन्नाच्या प्रमुख बाबी** :—जकात ( १७० कोटी रु. ), इक्साइज ड्यूटी ( २६० कोटी रु. ), प्राप्तीकर ( २१७ कोटी रु. ), संपत्ति कर ( १२ कोटी रु. ), रेल्वे भाड्यावरील कर ( ९ कोटी रु. ), खर्चावरील कर ( ३ कोटी रु. ), टपाल व तार खातें ( २ कोटी रु.), रेल्वेकडून डिव्हिडंड (५० कोटी रु. ), रिझर्व्ह बँकेकडून ( ३० कोटी रु. ) व स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ( ७ कोटी रु. )

**खर्चाच्या प्रमुख बाबी** :—संरक्षण खातें ( २७८ कोटी रु. ), मुलकी कारभार ( १३० कोटी रु. ), शिक्षण ( ३० कोटी रु. ), आरोग्य ( १६ कोटी रु. ), शेती ( १८ कोटी रु. ).

### प्रा. बेंदूर ह्यांचें शोचनीय निधन

पुणें येथील मुंबई राज्य सहकारी युनिअन व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्फत चालविण्यांत येणाऱ्या ' को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज ' चें एक प्रमुख प्राध्यापक श्री. बी. एस. बेंदूर हे ता. १५–२–१९५८ रोजीं गुलबर्गा शहराचे अलीकडे मद्रास एक्सप्रेसनें हैद्राबादेहून आंध्र राज्यांत विझयानगरकडे जात असतांना हृदयविकाराच्या ( कार्डीॲक थ्रांबोसिस ) च्या आकस्मिक आघातानें रात्रौ २ वाजतां चालत्या गाडींत निधन पावले. होटगी स्टेशनपर्यंत ते चांगले बोलत होते. निरनिराळया प्रांतांतून जे असिस्टंट रजिस्ट्रार्स, को. बँक मॅनेजर्स, सेक्रेटरीज, वगैरे अधिकारी या कॉलेजमध्यें सिनिअर ऑफिसर कोर्समध्यें शिक्षण घेत आहेत त्यांना घेऊन ते आंध्र राज्यांत एक महिन्याच्या शैक्षणिक सहलीवर ( स्टडी टूरवर ) विझयानगरकडे जात होते.

श्री. भवानी शंकर बेंदूर हे मद्रास राज्य सहकारी खात्यांत डे. रजिस्ट्रार होते. मद्रास को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे ते कांहीं वर्षे प्रिन्सिपॉल होते. मद्रास युनिव्हर्सिटीच्या बी. कॉम. च्या वर्गासहि ते कांहीं काळ प्राध्यापक होते. पुणें येथील को–ऑपरेटिव्ह कॉलेजमध्यें ते गेलीं ६–७ वर्षे काम करीत होते. निगर्वी व मनमिळावू स्वभावामुळें ते सर्वांस अत्यंत प्रिय असल्यानें त्यांच्या शोचनीय निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### दाढी करणाऱ्या न्हाव्याला २०० रुपये

अफगाणिस्तानचे राजे, झहीर शहा, ह्यांनीं डेहराडून येथील एका न्हाव्याकडून दाढी करवून घेतली, तेव्हां त्याला २०० रुपये दिले. २६ फेब्रुवारी, १९५८ रोजीं ही गोष्ट घडली.

### महाराष्ट्र ओ. संग्रहालयाला बंदुकीची देणगी

श्री. यू. ए. मीरचंदानी, आय. सी. एस., यांनीं त्यांचेजवळ असलेल्या जुन्या तीन बंदुका व दोन तलवारी संग्रहालयास देणगी म्हणून नुकत्याच दिल्या आहेत. हीं हत्यारें १०० वर्षांपेक्षां जुनी आहेत. हीं हत्यारें संग्रहालयांत मांडून ठेवण्यांत आलीं आहेत.







'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



# अर्थ

बुधवार, ता. ५ मार्च, १९५८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### नव्या औषधांच्या उपयोगासंबंधीं इषारा

भारतांत पेनिसिलिनसारख्या परिणामकारी औषधांची निपज होऊं लागली आहे. मनुष्याचें आरोग्य राखण्यासाठी ह्या औषधांचा उपयोग चांगला होतो. परंतु त्यांचा अनिर्बंध वापर करणें हिताचें नाहीं असा इषारा अमेरिकन मेडिकल जर्नलनें दिला आहे. पेनिसिलिन शोधून काढणारे संशोधक सर अलेक्झांडर फ्लेमिंग ह्यांनींहि असा इषारा देऊन हीं नवीन औषधें तारतम्यानें वापरण्यांत यावींत असें सुचविलें होतें. त्यांनीं असें मत व्यक्त केलें होतें कीं साध्या किरकोळ आजाराला पेनिसिलिनसारखीं औषधें वापरण्यांत आलीं तर एखाद्या मोठ्या आजाराच्या वेळीं तीं निष्प्रभ ठरण्याचा बराच संभव असतो. ह्या बाबतींत इस्पितळांतून आलेला अनुभवहि लक्षांत घेण्यासारखा आहे. कांहीं रोग्यांना हीं औषधें मुळींच मानवत नाहींत; कांहींना कातडीचे विकार होतात तर कांहीं औषधाच्या 'धक्क्या'नें मरतात सुद्धा. पेनिसिलिनसारखीं औषधें उठसुठ वापरल्यानें एकाद्या चांगल्या औषधाचा दुरुपयोग होतो इतकेंच केवळ नाहीं; कांहीं रोग्यांचें आरोग्यच त्यामुळें धोक्यांत येतें. अमेरिकेंतील इस्पितळांतून ह्या औषधांच्या वापरासंबंधीं एक नमुना-तपासणी करण्यांत आली आहे. तीन वर्षे माहिती गोळा करून केलेल्या ह्या तपासणींत असें दिसून आलें कीं २,५०० पेक्षा अधिक रोग्यांवर औषधांची फार वाईट प्रतिक्रिया झाली, आणि ती प्रतिक्रिया दुष्परिणामी ठरूं नये म्हणून उलट उपचार करावे लागले. आरोग्याचा रोजगारांशीं संबंध असल्यानें रोगीहि पुष्कळदां टोंचून घेण्याचा आग्रह धरतात. म्हणून ह्या बाबतींत डॉक्टर मंडळींनींच सावधानता वा तारतम्य दाखविलें पाहिजे.

### वृद्धापकाळच्या पेन्शनला पैसा नाहीं

भारत स्वतंत्र झाल्यापासून राज्यसंस्थेचें स्वरूप बदलत चाललेलें आहे. केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्याचेंच सरकारचें काम आहे ही कल्पना त्याज्य मानली जाऊं लागली आहे. त्याच्याऐवजीं कल्याणकारी राज्याची कल्पना मूळ धरूं लागली आहे. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेंत निराधार वृद्धांना पेन्शन अथवा निवृत्तीचें वेतन देण्याची एक बाब आहे. उत्तर प्रदेश सरकारनें १९५७ च्या डिसेंबरपासून अशा प्रकारची एक योजना अंमलांत आणली आहे. ७० वर्षे अगर अधिक वय असलेल्या निराधार व नातलग नसलेल्या वृद्धांना निवृत्तिवेतन देण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. गेल्या जानेवारींत अशा वृद्धांकडून आलेल्या अर्जांचा विचार करण्यांत येऊन १,०५५ वृद्धांचे अर्ज मंजूर करण्यांत आले. उत्तर प्रदेशांतील ७,५५१ वृद्धांकडून वेतनासाठी अर्ज आलेले आहेत. सुमारें २,७०० अर्जांचा विचार करण्यांत येत आहे. निवृत्तीचें वेतन देण्याची ही योजना उत्तर प्रदेशांतील ग्रामीण विभागांत अजून माहिती झालेली नाहीं. तशी ती झाल्यावर आणखी बरेंच अर्ज सरकारकडे येण्याचा संभव आहे. मुंबई राज्याच्या वरिष्ठ सभागृहांत राज्यांतील ६० वर्षे वयाच्या वृद्धांना निवृत्तीवेतन देण्यांत यावें असा ठराव विरोधी पक्षातर्फे मांडण्यांत आला होता. त्याला विरोध करतांना अर्थमंत्री श्री. जीवराज मेहता म्हणाले कीं ६० वर्षे वयाच्या पुढें असलेल्या लोकांची राज्यांतील संख्या १,२०,००० ते १,५०,००० असावी. इतक्या लोकांना दरमहा २५ रुपये द्यावयाचें म्हटलें तर सरकारला ४ कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. अर्थातच सध्यांच्या परिस्थितींत असें वेतन देतां येणें शक्य नाहीं.

### रेल्वेजची वाढती स्वयंपूर्णता

रेल्वे डबे, वाघिणी, इंजिनें, इत्यादींचे बाबतींत स्वयंपूर्ण होण्यांत या वर्षांत आणखी प्रगति झाली आहे.

सर्वसाधारण कामकाजांसाठी लागणाऱ्या वाघिणींची आयात केव्हांच बंद झाली असून, वाफेवर चालणाऱ्या इंजिनांची-नॅरो गेज मार्गावर लागणारीं इंजिनें वगळतां-आयातहि आतां बंद करण्यांत आली आहे.

इंजिनें, डबे, वाघिणी, यांसाठी १९५८-५९ मध्यें तरतूद करण्यांत आलेल्या ८७·९५ कोटी रु. पैकी ६०·१७ कोटी रु. देशांत, तर बाकीचा पैसा परकीय आयातीवर खर्च होईल

चित्तरंजन कारखान्यांत १९५६-५७ मध्यें १५६ इंजिनें तयार झालीं. चालू वर्षांत व पुढील वर्षांत १६८ इंजिनें तयार होण्याची अपेक्षा आहे. टेलकोनें गतवर्षी ७८ इंजिनें दिलीं. चालू वर्षांत या कारखान्याकडून ९०, तर पुढील वर्षी १०० इंजिनें मिळण्याची अपेक्षा आहे.

इंटिग्रल कोच फॅक्टरींतील अनफर्निश्ड कोचेसचें उत्पादन गतवर्षीच्या ८८ वरून यंदां १८० वर आणि पुढील वर्षी २९५ वर जाण्याची अपेक्षा आहे. एक पाळी करून ३५० संपूर्ण डब्यांचें उत्पादन १९५९-६० मध्यें साध्य होईल असें वाटतें. १ एप्रिल, १९५९ पासून या कारखान्यांत दोन पाळया सुरू करण्याचा विचार आहे.

### श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांची स्पष्टोक्ति

अहमदाबाद येथें एका भाषणांत श्री. ए. डी. श्रॉफ (सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व मुंदडा चौकशी पुढील तज्ञ साक्षीदार) हे म्हणाले "कंपनी कायद्याची अंमलबजावणी अधिक कसोशीनें करण्याची व शेअर्स खासगी व्यक्तींच्या हातीं एकवटूं न देण्याची आवश्यकता मुंदडा प्रकरणानें पटवून दिली आहे. श्री. मुंदडा ह्यांच्या कंपन्यांचे शेअर्स अंडरराइट करण्यास नकार देण्यांत हिंदी बँकांनीं शहाणपण दाखविलें आहे. तीन प्रमुख ब्रिटिश बँकांनीं मात्र ती दक्षता घेतली नाहीं; त्यामुळें श्री. मुंदडा ह्यांना वाव मिळाला. ब्रिटिश बँकांच्या चुकीमुळें त्या बँकांना बरेंच नुकसान सोसावें लागेल. जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारचा कारभार योग्य तितक्या दक्षतेचा नाहीं; तो पुरेसा दक्षतेचा असता तर मुंदडा प्रकरण निष्पन्न झालेंच नसतें."

## साम्राज्याच्या नारळांतील खोबरें गेलें; हातीं करवंटी उरली

### छोट्या वसाहतींची वासलात कशी लावणार ?

ब्रिटिश साम्राज्यांतील मोठ्या क्षेत्रफळाचे व लोकसंख्येचे देश स्वतंत्र झाले किंवा त्यांना स्वातंत्र्य देण्यांत आलें, त्यामुळें ज्या अगदीं लहान वसाहती साम्राज्यांत उरल्या आहेत त्यांचें काय करावयाचें, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. जागतिक व्याप्तीच्या साम्राज्याचे दुवे म्हणून अशा बेटांना, प्रदेशांना, पूर्वीं जें स्थान होतें, तें आतां उरलेलें नाहीं. ह्या लहान वसाहती स्वावलंबी, स्वायत्त बनून कधींकाळीं युनायटेड नेशन्सच्या सभासद होण्याची शक्यता नाहीं. ब्रिटिशांना ह्या वसाहती स्वतःकडे ठेवणें फायद्याचें उरलेलें नाहीं; त्यामुळें शेजारच्या देशांना नवा मुलूख आपल्यांत सामील करण्याची ही एक संधीच वाटत आहे.

ग्रीस आणि टर्की सायप्रससाठी भांडत आहेत, चिली आणि अर्जेंटिना फॉकलंड बेटें वाटून घेऊं पहात आहेत, ग्वाटेमाला आणि मेक्सिको ह्यांच्यांत ब्रिटिश हॉंडुराजला गिळंकृत करण्याची स्पर्धा लागली आहे. चीनला हॉंगकॉंग मिळण्याची खात्री वाटत आहे, तर येमेनला एडन मिळण्याची आशा आहे. सार्वभौम सत्तेची पकड एकदां सुटूं लागली, म्हणजे साम्राज्यांतील लहान-सहान प्रदेशांची स्थिति अशी होणें स्वाभाविक आहे. ब्रिटिश साम्राज्याप्रमाणें इतर साम्राज्यांचीहि हीच अवस्था झाली आहे. वेस्ट इरिअन मिळविण्याचा इंडोनेशिआनें चंग बांधला आहे, स्पेनचा जिब्राल्टरवर डोळा आहे, पण त्याच स्पेनच्या पश्चिम आफ्रिकेंतील प्रदेशावर मोरोक्को आक्रमण करूं पहात आहे !

साम्राज्यांतील मोठे प्रदेश हातचे गेल्यानंतर, किरकोळ मुलुखासाठी वसाहत खातें चालू ठेवणें पुष्कळ इंग्रजांना पटत नाहीं. त्यांत त्यांना नामुष्की वाटते. वसाहतींपासून मिळणारे फायदे संपून गेल्यानंतर, 'वसाहतवाले' म्हणून नुसतें दूषण तेवढें उरतें. त्यामुळें, प्रतिस्पर्धी देशांना प्रचाराचें साधन मिळतें; ब्रिटिशांचें राजकीय दृष्टीनें त्यामुळें नुकसान होतें. ह्या प्रदेशांचा कारभार चालविण्यास खर्चहि पुष्कळ येतो. लेखाचे शेवटीं दिलेल्या तक्त्यांत ब्रिटिश साम्राज्यांतील उरलेल्या वसाहतींची लोकसंख्या व क्षेत्रफळ ह्यांचा तपशील दिला आहे.

त्या तक्त्यांतील वसाहतींची लोकसंख्या, क्षेत्रफळ, जगांतील त्यांचें स्थान, ह्यांचा विचार केला, तर त्या वसाहतींची वासलात लावणेंसुद्धां सोपें नाहीं असें दिसून येईल. ब्रिटिश सरकारच्या वसाहत खात्यानें त्यासाठीं एक कमिटी नेमली होती, पण तिलाहि समाधानकारक मार्ग दाखविता आलेला नाहीं. वेगवेगळ्या वसाहतींची मिळून संघराज्यें करण्याची कल्पना प्रत्यक्षांत आणणें कठीण आहे; कारण त्या वसाहतींत साम्य असें थोडेंच आहे. शेजारच्या दुसऱ्या देशांत त्या वसाहती विलीन करणें, हाहि एक मार्ग आहे. पण, त्या वसाहतींतील नागरिकांच्या मताला महत्त्व आहे कीं नाहीं, हा प्रश्न राहातोच. त्या वसाहतींना स्वतंत्र, सार्वभौम अस्तित्व टिकवितां येणें तर शक्य नाहीं; तें परवडणारहि नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांतील मोठ्या देशांना कांहीं जबाबदारी उचलण्यास सांगितली, तर ते हो म्हणतीलच अशी खात्री नाहीं. लष्करी महत्त्वाचे म्हणून जे छोटे प्रदेश ग्रेटब्रिटननें पूर्वीं बळकावून स्वतःकडे राखले, त्या प्रदेशांपैकीं कित्येकांचें महत्त्व आतां उरलेलें नाहीं. त्यांना सोडून द्यायला ब्रिटन तयार झाला, तरी दुसऱ्याच्या ताब्यांत देण्यास मात्र तो कबूल होणार नाहीं. कांहीं झालें तरी, कम्युनिस्टांना वाव मिळूं नये आणि पाश्चात्य देशांबद्दल जिव्हाळा कायम रहावा, ह्याच दृष्टीनें हा प्रश्न सोडवावा, अशी ब्रिटिशांची इच्छा आहे; प्रतिष्ठेचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी आतां तो गौण बनला आहे.

### ब्रिटिश साम्राज्यांतील छोट्या वसाहती

| वसाहत | लोकसंख्या | क्षेत्रफळ (चौ. मैल) |
|---|---|---|
| हॉंगकॉंग | २४,४०,००० | ३९१ |
| सिंगापूर | १२,६४,००० | २२४ |
| एडन | ७,८८,००० | २,२५,००० |
| सोमालीलँड | ६,४०,००० | ६८,००० |
| सारावाक | ६,१४,००० | ४७,०७१ |
| मॉरिशस | ५,४३,००० | ८०९ |
| सायप्रस | ५,२०,००० | ३,५७२ |
| ब्रि. गियाना | ४,८५,००० | ८३,००० |
| उ. बोर्नियो | ३,६४,००० | २९,३८७ |
| फिजी | ३,३९,००० | ७,०४० |
| माल्टा | ३,१४,००० | १२२ |
| गँबिया | २,८१,००० | ४,००३ |
| झांजिबार | २,७४,००० | १,०२० |
| सॉलोमन बेटें | ९९,५०० | ११,००० |
| बहामाज | ९५,५०० | ४,४०० |
| ब्रि. हॉंडुराज | ७९,००० | ८,८६६ |
| ब्रुनेई | ६३,३०० | २,२२६ |
| टॉंगा | ५३,८०० | २६९ |
| बर्मुडा | ४०,८०० | २१ |
| गिल्बर्ट बेटें | ४०,८०० | ३६९ |
| सिचिलीज | ३८,७०० | १५६ |
| जिब्राल्टर | २४,९०० | २ |
| सेंट हेलेना | ४,८८० | ४७ |
| रॉड्रिग्जस | १४,००० | ४२ |
| व्हर्जिनिया बेटें | ७,६८० | ६७ |
| फॉकलंडस | ४,६१८ | ३,५८० |
| ट्रिस्टन | २८० | ३८ |
| पिटकाइरन | १२० | २ |

**निर्वासितांची पुनर्वसाहत**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या कांहीं निर्वासितांची म्हैसूरमध्यें पुनर्वसाहत करण्यांत येणार आहे. एकूण सुमारें ८०० निर्वासित शेतकरी कुटुंबांची वसाहतींत सोय करण्यांत येणार आहे. वसाहतीसाठीं लागणारी जमीन साफसूफ करण्याचें काम सुरू झालें आहे.

**हैड्रोजन बाँबविरुद्ध मोहीम**—ब्रिटननें शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेंत भाग न घेतां हैड्रोजन बाँबला बंदी घालण्याच्या कामीं पुढाकार घ्यावा अशा मताचे लोक ब्रिटनमध्यें वाढत आहेत. ह्या विषयासंबंधीं लंडनमध्यें एकाच दिवशीं पांच सभा भरविण्यांत आल्या असतां प्रत्येक सभेला ५,००० वर श्रोते उपस्थित होते.

**मॉस्को-दिल्ली विमान प्रवास**—मॉस्को ते दिल्ली वैमानिक मार्ग सुरू करण्यासाठीं सध्यां उभयता देशांच्या प्रतिनिधींत वाटाघाटी चालल्या आहेत. वाटाघाटी समाधानकारक रीतीनें चालल्या असून त्यांची तांत्रिक बाजू स्पष्ट झाल्यावर उभयतां देशांत हवाई दळणवळणाचा व्यापारी करार करण्याचा विचार होईल.

# विभागीय सहकारी बँका कार्यक्षम ठरतील काय ?

(लेखक : द. वि. चितळे, पुणें)

श्री. मु. पु. दाणी, जळगांव, यांनीं दि. १ जानेवारी, १९५८ रोजीं "अर्थ"मध्यें "सहकारी क्षेत्रांतहि विकेंद्रीकरण हवें" या विषयासंबंधीं एक प्रदीर्घ लेख लिहून त्यांत मुंबई राज्यांत विभागीय मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन केल्यास हल्लींच्या राज्य सहकारी बँकेपेक्षा अधिक कार्यक्षम, निदान वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांचा सहकारी पद्धतीनें योग्य प्रकारें विकास करण्याच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त ठरतील असें फार जोरदारपणें प्रतिपादन केलें आहे; त्यांनीं याबाबतचा आपला दृष्टीकोन सदर लेखांत फार मार्मिकपणें मांडला आहे. श्री. दाणी यांनीं विभागीय सहकारी बँका मुंबई राज्यांत स्थापन कराव्या अशी जी सूचना आपल्या लेखांत केली आहे, ती वादातीत आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. सदर विषयाला श्री. दाणी यांनीं आपला लेख प्रसिद्ध करून तोंड फोडलें आहे तें एकप्रकारें बरेंच झालें; यामुळें तरी या विषयासंबंधीं वेगवेगळ्या तज्ज्ञांना आपलीं मतें प्रदर्शित करतां येऊन माझ्यासारख्या सहकारी चळवळीच्या अभ्यासूंचें त्यांना मार्गदर्शन करतां येईल. असें मला वाटतें.

सहकारी चळवळीचा श्री. दाणी यांच्याइतका माझा सखोल अभ्यास नसला तरी कांहीं सहकारी संस्थांशीं व विशेषत: पुण्यांतील एका मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराशीं माझा कांहीं काळ जवळून प्रत्यक्ष संबंध आला असल्यानें श्री. दाणी यांच्या वेगवेगळ्या सूचनांचा निर्विकारपणें विचार केल्यानंतरहि मी त्यांच्या कांहीं महत्त्वाच्या विचारांशीं सहमत होऊं शकत नाहीं याबद्दल मी दिलगीर आहें. याबाबतचे माझे कांहीं विचार मी यापुढें देत आहें.

## विकेंद्रीकरण झालें पाहिजे

सहकारी चळवळ ही लोकमतानुवर्ती झाली पाहिजे याबद्दल दुमत असण्याचें कारण नाहीं व त्यादृष्टीनें या संस्थांच्या कामकाजांत केंद्रीकरण होतां कामा नये हेंहि उघड आहे; त्याचें जेथें जेथें व ज्या ज्या प्रकारें विकेंद्रीकरण करणें शक्य असेल तेथें तेथें तसा प्रयत्न झाला पाहिजे याबद्दलहि मतभिन्नता असण्याचें कारण नाहीं. मात्र, अशा प्रकारें विकेंद्रीकरण करणें हें चळवळीच्या दृष्टीनें उपयुक्त ठरणार असेल तरच तें केलें जावें; नाहींतर तो प्रयत्न आत्मघातकी ठरण्याचा संभव आहे.

## श्री. दाणी यांच्या सूचना

श्री. दाणी यांचें म्हणणें पुढीलप्रमाणें असावें असें दिसतें:—

नवीन बनलेल्या मुंबई राज्यांत सामील करण्यांत आलेलें भौगोलिक क्षेत्र म्हणजे सौराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, वगैरे प्रांत व पूर्वीचा गुजराथ व महाराष्ट्र हे प्रांत यांच्यांत दिसून येणारा आर्थिक विकास हा एकाच प्रमाणांत झालेला आहे अगर होत आला आहे असें म्हणतां येणार नाहीं. सबब, अशा प्रकारें ठिकठिकाणीं दिसून येणारी आर्थिक विषमता लक्षांत घेतली तर मुंबई राज्यांत हल्लीं प्रचलित असलेली मध्यवर्ती सहकारी बँकांची रचना (स्ट्रक्चर) ही चळवळीचें दृष्टीनें पोषक व उपकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं. वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांच्या आर्थिक गरजा भिन्नभिन्न असल्यानें, तसेंच तेथील रहिवाशांची मनोरचना वेगवेगळी असल्यानें, मुंबईसारख्या राजधानीचे ठिकाणीं स्थापन करण्यांत आलेल्या एकाच राज्य सहकारी बँकेकडून वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी जरूर असलेली वेगवेगळी मदत व सेवा ही मिळूं शकेल असें वाटत नाहीं व ती तशी तिला वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी विषमतेनें देतांहि येणार नाहीं. सबब सबंध राज्यासाठीं एकच शिखरस्त सहकारी बँक ठेवण्याच्या ऐवजीं वेगवेगळ्या विभागांसाठी वेगवेगळ्या शिखरस्त पांच–सहा मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन करण्यांत याव्या व अशा प्रकारें हल्लीं एकाच शिखरस्त बँकेंत जी शक्ति केंद्रित झाली आहे तिचें विकेंद्रीकरण करण्यांत यावें. या वेगवेगळ्या पांच–सहा विभागीय शिखरस्त सहकारी बँकांच्या कामकाजांत एकसूत्रीपणा आणण्याची जरूरी भासत असेल तर त्यांची एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यांत यावी किंवा हल्लींच्या राज्य सहकारी बँकेचें अशा मध्यवर्ती संस्थेंत रूपांतर करण्यांत यावें. असें केल्यानें या नवीन स्थापन होणाऱ्या विभागीय सहकारी बँका आपापली वाढ व कामकाज स्थानिक गरजेनुसार करूं शकतील; पण जेथें हें काम योग्य प्रकारें तेथील विभागीय बँकेकडून कांहीं विशेष कारणामुळें अगर अडचणींमुळें होऊं शकत नसेल तेथें या मध्यवर्ती संस्थेनें विशेष लक्ष देऊन ती विभागीय बँक आपलें काम योग्य प्रकारें करण्यास ज्यायोगें सबळ होईल अशा प्रकारची जरूर ती सर्व मदत मध्यवर्ती बँकेनें त्या बँकेस कांहीं काळपर्यंत करीत रहावें; मात्र ती विभागीय बँक बंद करूं नये अगर तिचें काम मध्यवर्ती संस्थेनें आपणाकडे कायमचें म्हणून घेऊं नये. अशा प्रकारें हल्लींच्या राज्य सहकारी बँकेंत केंद्रित झालेल्या अधिकाराचें व शक्तीचें विभाजन करण्यांत यावें.

## पूर्व इतिहास

श्री. दाणी यांनीं केलेली सूचना सकृत्दर्शनी योग्यच वाटते व ती तात्काळ अंमलांत आणावी असेंहि वरवर विचार करणारास वाटण्याचा संभव आहे. विभागीय बँकांची ही कल्पना श्री. दाणी यांना प्रथमच सुचत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आपल्या राज्यांत मुंबई राज्य सहकारी बँक स्थापन झाल्यानंतर वेगवेगळ्या लहान–मोठ्या मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन झाल्या आहेत असें आपल्या राज्यांतील सहकारी चळवळींच्या इतिहासावरून दिसून येतें. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन करण्याऐवजीं आरंभीं विभागीय बँकाच स्थापन करण्याचा त्यावेळेच्या प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांनीं प्रयत्न केला होता असेंच दिसतें. "सिंध" मध्यवर्ती सहकारी बँक किंवा "कर्नाटक" मध्यवर्ती सहकारी बँक ह्यांच्या नांवावरून तरी ह्या बँका त्या त्या विभागासाठीं म्हणून स्थापन झाल्या असाव्यात असें दिसतें. गुजराथ विभागासाठीं अशी विभागीय बँक का स्थापन केली गेली नसावी, याचें आमच्या दृष्टीनें हें कारण असावें कीं गुजराथ येथील सामान्य शेतकरी व इतर विभागांतील सामान्य शेतकरी यांच्या आर्थिक परिस्थितींत, तसेंच त्यांना शेतीच्या व्यवसायासाठीं कर्जाऊ लागणाऱ्या भांडवलाच्या भासणाऱ्या जरूरींत बराच फरक आहे. या परिस्थितीमुळें गुजराथ विभागांत मध्यवर्ती सहकारी बँका फार मंदगतीनें स्थापन होऊं शकल्या. एवढेंच नव्हे, तर अहमदाबाद जिल्ह्यांत परवांपरवांपर्यंत जिल्हा मध्यवर्ती बँक स्थापन झालेली नव्हती; कारण तेथील शेतकऱ्यांना अशा बँकेची विशेष तीव्रतेनें जरूरीच भासत नसावी. यावरून आम्ही वर केलेल्या विधानास पुष्टीच मिळते. असो. महाराष्ट्रासाठींहि अशीच विभागीय बँक काढण्याचा प्रयत्न झालेला आहे. केवळ "महाराष्ट्र" मध्यवर्ती सहकारी बँक या नांवाची संस्था आपणांस आज जरी दिसत नसली तरी पुण्याची मध्यवर्ती बँक ही "पुणें जिल्हा" मध्यवर्ती सहकारी बँक नसून ती "पुणें" मध्यवर्ती सहकारी बँक आहे हें लक्षांत घेतां "कर्नाटक" बँकेनें कर्नाटक विभागांत जी कामगिरी केली

पाहिजे अशी त्यावेळेची अपेक्षा व कल्पना होती तीच कामगिरी पुणें बँकेकडून महाराष्ट्र विभागांत व्हावी अशी त्यावेळच्या सहकारी कार्यकर्त्यांची अपेक्षा होती व म्हणूनच त्या बँकेच्या नांवांत "जिल्हा" हीं अक्षरें मुद्दाम वगळण्यांत आलीं होतीं. या सर्व विवेचनावरून वाचकांच्या हें सहज ध्यानीं येईल कीं, "विभागीय" सहकारी बँका काढण्याचा प्रयोग आपल्या राज्यांत यापूर्वीच होऊन गेलेला आहे. "सिंध" बँकेनें "विभागीय" शिखरस्थ बँक म्हणून कोणती कामगिरी केली व ती कितपत कार्यक्षम झाली याची चर्चा आतां तो भौगोलिक विभाग भारतांतून तुटला असल्यानें न केलेलीच बरी. "कर्नाटक" किंवा "पुणें" या बँकांनीं विभागीय शिखरस्थ बँका म्हणून कांहींहि काम केलेलें नाहीं हें स्वानुभवानें आम्हांस माहीत आहे. "कर्नाटक" बँकेकडून धारवाड जिल्ह्याबाहेर कांहींहि काम झालेलें नाहीं व "पुणें" बँकेनें तिच्या स्थापनेपासून सुमारें तीस वर्षेंपर्यंतहि संपूर्ण पुणें जिल्हा व्यापलेला नव्हता हें लक्षांत घेतां तिचेकडून महाराष्ट्रांतील इतर विभागांत कांहींहि काम झालेलें नाहीं हें स्पष्टपणें नमूद करण्याचें कारणच नाहीं. "नांव लक्ष्मीबाई व हातीं कथलाचा वाळा" अशी या मानीव "विभागीय" बँकांची परिस्थिति होती. हा इतिहास लक्षांत घेतां पूर्वीचाच प्रयोग पुन्हा करून पहाण्यांत कांहीं स्वारस्य आहे असें आम्हांस तरी वाटत नाहीं. अशा कमकुवत "विभागीय शिखरस्थ" बँका काढल्यानें त्या आपल्या विभागांतील सहकारी संस्थांना अधिक सवलतीनें आर्थिक मदत करूं शकतील किंवा त्यांचेकडून त्या संस्थांना अधिक कार्यक्षमतेनें मार्गदर्शन होऊं शकेल, असेंहि आम्हांस वाटत नाहीं.

### हल्लींचीच परिस्थिति योग्य

"एक बँक व तिची एकच कचेरी" आणि "एक बँक व तिच्या अनेक कचेऱ्या" या दोन प्रकारच्या मांडणींपैकी दुसरी ही पहिली पेक्षा जास्त प्रभावी ठरते असा सार्वत्रिक अनुभव येत असतां श्री. दाणी हें पहिल्या प्रकाराचा पुरस्कार कां करतात तें त्यांच्या लेखावरून आम्हांस तरी पुरेसें समजलें नाहीं. त्यांचा आग्रह एवढाच दिसतो कीं, राज्य बँकेस वेगवेगळ्या विभागाकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून पाहणें तिच्या हल्लींच्या नियमान्वयें कठीण होईल व त्यामुळें मागासलेल्या भागाकडे पुढारलेल्या भागापेक्षा जास्त सहानुभूतीनें पहाणें जरूर असूनहि राज्य-बँकेकडून तशी भिन्न वागणूक त्या भौगोलिक विभागास मिळूं शकणार नाहीं. वादासाठी ही भूमिका मान्य करूनहि, श्री. दाणी सुचवितात तशा "विभागीय" बँका काढल्यानें ही अडचण दूर होऊं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं. मागासलेल्या विभागानें आपणासाठी त्याच विभागांत स्थापन केलेली स्वतंत्र व स्वयंशासित मध्यवर्ती बँक ही पुढारलेल्या विभागांतील अशा प्रकारें स्थापन झालेल्या बँकेच्या मानानें आर्थिक दृष्ट्या कमकुवत राहणार हें उघडच आहे; व मग अशा बँकेकडून विशेष सवलतीनें पुरेसें भांडवल त्या विभागांतील सर्व सहकारी संस्थांना मिळूं शकेल अशी अपेक्षा करणें हें चुकीचें ठरेल. जेवढी बँक मोठी, तेवढी तिचेकडून जास्त सवलतीनें मदत मिळण्याची शक्यता अधिक असते हें सर्वमान्य तत्त्व आहे व तें लक्षांत घेतां श्री. दाणी यांनीं सुचविलेली योजना प्रत्यक्ष अमलांत आणण्यापूर्वी वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून पुष्कळच विचार झाला पाहिजे असें आम्हांस वाटतें. आम्हांस राज्य सहकारी बँकेची येथें वकिली करावयाची आहे असें कोणीहि कृपाकरून समजूं नये. उलट श्री. दाणी यांनीं आपल्या लेखांत जी भीति प्रदर्शित केली आहे तिचेकडे राज्य सहकारी बँकेच्या चालकांनीं विशेष लक्ष वेळींच द्यावें असें आम्हीं त्यांस सुचवूं इच्छितों. मुंबईच्या राज्यांत नवीन समाविष्ट झालेल्या विभागापैकीं जो विभाग सहकारी चळवळीच्या दृष्टीनें मागासलेला असेल तो इतर विभागाइतका प्रगत होईपर्यंत त्या विभागाकडे विशेष सहानुभूतीनें राज्य बँकेनें पाहिलें पाहिजे, नव्हे तें तिचें कर्तव्य आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे.

### कांहीं विशेष फायदे

श्री. दाणी यांनीं केलेल्या सूचनेबाबत आमचें मत आम्ही वर नमूद केलें आहे त्यावरून श्री. दाणी यांच्या कांहीं विचारांशीं आम्हीं सहमत होऊं शकत नाहीं हें वाचकांच्या ध्यानीं येईलच. तथापि श्री. दाणी यांची सूचना अमलांत आल्यास त्यापासून थोडे–फार फायदे होतील याचीहि आम्हांस जाणीव आहे. नवीन पांच–सहा विभागीय शिखरस्थ सहकारी बँका स्थापन झाल्यास त्यामुळें सुशिक्षितांची थोडीशी बेकारी कमी होईल हें शक्य आहे; तसेंच सहकारी चळवळींतील कांहीं कार्यकर्त्यांना अधिक मानाचें स्थान प्राप्त होऊं शकेल, हेंहि खरें आहे आणि त्याचबरोबर त्यांना भत्ते वगैरे मिळाल्यामुळें त्यांची सांपत्तिक परिस्थिति थोडीफार सुधारण्यास मदत होईल ही बाब विचारांत न घेण्याइतकी किरकोळ आहे, असेंहि म्हणतां येणार नाहीं.

## पुढे पाऊल

लेखक—श्री. श्रीपाद वामन काळे, संपादक 'अर्थ' पृ. सं. १३०, किंमत २ रुपये.

"सुमारें तीन वर्षांपूर्वी श्री. काळे यांनीं 'कण व क्षण' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. तें महाराष्ट्रांत लोकप्रिय झालें. 'पुढे पाऊल' हें त्याच धर्तीवर लिहिलेलें आहे. यांत १६ निबंध आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांतील कांहीं महत्त्वाच्या समस्यांचा यांत विचार केलेला आहे. 'समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी,' या पहिल्या निबंधांत तरुण पिढी बिघडली ही जी हाकाटी ऐकूं येते तिचें वास्तविक स्वरूप काय आहे हें दाखविलें आहे व असलेले दोष सुधारण्याचे उपाय सुचविले आहेत. 'कॉलेजांतील मुली व त्यांचे आईबाप,' 'वर–संशोधनाची आर्थिक मीमांसा,' 'मिश्र समाजांतील खाचखळगे,' हे लेख चिंतनीय आहेत. बाकीच्या लेखांत, आपल्या दररोजच्या सामाजिक जीवनांत स्वार्थामुळें किंवा सामाजिक जीवनाची हेळसांड केल्यामुळें समाजाचें जें नुकसान होत आहे तें अत्यंत हळूवारपणानें व सहानुभतीनें दाखविलें आहे. आपणांत कोणते दोष आहेत हें या पुस्तकाच्या वाचनानें प्रत्येकास कळेल व थोडी फार तरी त्याला स्वकर्तव्याची जाणीव होईल. लेखकाची भाषा साधी, सोपी व ओघवती आहे त्याचें अवलोकन सूक्ष्म आहे. त्याचा विनोद मार्मिक आहे, उपहास आहे, पण तो बोचक नाहीं."

—महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणें, ह्या संस्थेनें पुस्तकास ४० रु. चें बक्षिस देतेवेळीं प्रस्तुत पुस्तकाची केलेली शिफारस.


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## " तुमचें स्थान कोणतें ? "

लेखक व प्रकाशक : श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४. किंमत २ रुपये. )

श्रीमंती वा गरिबी आपल्या हातांतील नाहीं. परंतु आहे त्या परिस्थितींतसुद्धां सुख प्राप्त करून घेणें फारसें अवघड नसतें. रोजच्या जीवनांत हरघडी असे अनेक प्रसंग उद्‌भवत असतात कीं आपण गरीब आहोंत कीं श्रीमंत आहोंत यांवर तें सुखद होणार किंवा दुःखद ठरणार तें फारसें अवलंबून नसतें. त्याप्रसंगीं आपण कसें वागतों यावरच त्यांना इष्ट किंवा अनिष्ट कलाटणी मिळणें अवलंबून असतें. पुष्कळ वेळां अभावितपणें आपल्या हातून असें कांहीं घडतें, कीं त्यामुळें रंगाचा बेरंग होऊन जातो, सर्वांच्याच आनंदावर विरजण पडतें आणि आपल्यालाहि त्यामुळें मनस्ताप होतो व कित्येकांना तर पश्चात्ताप होतो. तसें पाहिलें तर असा शेवट व्हावा हें आपल्यालाहि अभिप्रेत नसतें. उलट आपण मुद्दाम आनंद व्यक्त करण्यासाठी एखादा समारंभ योजलेला असतो आणि घडतें मात्र वेगळेंच.

हें टाळावयाचें असेल तर लहानसहान प्रसंगींसुद्धां कसें वागावें ह्यासंबंधींचे कांहीं नियम ठरवून ते पाळणें आवश्यक असतें. ते पाळल्यानें आपलें कांहीं विशेषसें नुकसान होणार नसतें. परंतु ह्याउलट ते पाळले नाहींत तर मात्र आपला आनंद नाहींसा होण्याचा संभव असतो. हें लक्षांत घेतां असे नियम कोणीतरी विचारपूर्वक ठरवून आपल्याला सांगणें अवश्य आहे असें वाटतें. परंतु असें मार्गदर्शन सध्यांच्या परिस्थितींत तरी होणें कठीण असतें. कारण, घरांत वडीलधारी माणसें सहसा नसतात आणि असलींच तरी तीं सध्यांच्या जगाशीं बरीचशी अपरिचित असतात. ही उणीव श्री. श्री. वा. काळे यांच्या 'तुमचें स्थान कोणतें ?' ह्या पुस्तकानें भरून काढली आहे त्यांत कांहीं मोठे मौलिक विचार आहेत असें नाहीं; परंतु आवश्यक त्या मार्मिक सूचना आहेत. त्या पाळल्या तर रोजचेंच जीवन कितीतरी अधिक सुखदायी होईल.

'कण आणि क्षण', 'पुढे पाऊल' ह्या लेखकाच्या पूर्वीच्या पुस्तकांत सर्वसाधारण सूचनांवर विशेष भर होता; परंतु ह्या पुस्तकांत विशिष्ट नात्यानें वावरणारी व्यक्ति किंवा विशिष्टप्रसंगीं पाळावयाचे विधिनिषेध यांचा विशेष उल्लेख आहे. 'लष्करी अधिकाऱ्याची पत्नी' किंवा 'चहा-फराळाची गोडी' ह्या त्यांतील प्रकरणांवरून त्यांतील आशयाची कल्पना येईल. सुशिक्षित स्त्रियांचे समृद्ध संसार' व 'मुलामुलींचे परस्पर संमतीनें विवाह' हीं त्यांतील प्रकरणें विशेष उल्लेखनीय असून त्यांतील विचारहि उद्‌बोधक आहेत.

आपल्या वर्तनानें आपल्या व इतरांच्या आनंदांत भरच पडावी अशी इच्छा असणाऱ्या प्रत्येकाच्या दृष्टीनें श्री. काळे यांचें हें पुस्तक अवश्य वाचनीय असून अत्यंत उपयुक्त आहे.

—लोकसत्ता

२२-२-५८

---

**फलटणच्या कॉलेजला मदत**—मुंबई सरकारनें फलटण येथील मुधोजी कॉलेजला कॉलेजचा विस्तार करण्यासाठी एक लाख रुपयांची मदत दिली आहे. फलटण संस्थान मुंबई राज्यांत विलीन झालें त्यावेळीं संस्थानच्या सरकारनें आपल्याजवळील ६० लाख रुपयांची शिल्लक मुंबई सरकारच्या स्वाधीन केली होती. त्यांतून ही रक्कम देण्यांत आली आहे.

### पेटंटच्या ऑफिसचा १९५६ चा अहवाल

१९५५ मध्यें पेटंटस् घेण्यासाठीं २,७३६ अर्ज आले होते. हा आंकडा १९५६ मध्यें ३,०६७ वर गेला. डिझाइन्सची नोंदणी करणाऱ्या अर्जांची संख्याहि या काळांत ३,८२५ वरून ४,३७३ वर गेली. भारतांतून पेटंटासाठी केलेल्या अर्जांची संख्या या काळांत ४४६ वरून ५४० वर गेली. यांपैकीं ४८२ अर्ज भारतीयांचे होते. भारतांतून करण्यांत आलेल्या अर्जांपैकीं ५६ टक्के अर्ज मुंबई व प. बंगाल राज्यांतील होते.

शोध लावण्याच्या बाबतींत रासायनिक धंदा पूर्वीप्रमाणेंच आघाडीवर होता. अन्न व वैद्यकीय क्षेत्रांत साखरधंद्याचा विकास करण्याच्या दृष्टीनें व निरनिराळे रस व साखरयुक्त द्रावकें शुद्ध करण्याबाबत प्रामुख्यानें शोध लावण्यांत आले. परदेशांतील शोध ॲन्टीबॉयोटिक्ससंबंधीं होते. तसेंच जंतुनाशक डी. डी. टी. इ. संबंधींच्या शोधांबाबतहि कांहीं अर्ज आले होते.

परदेशांतून आलेल्या शोधांत लोखंड व पोलाद धंद्यासंबंधीं बरेच शोध होते. ओतीव लोखंडाचें शुद्धीकरण, बरड लोखंड विद्युत्पद्धतीनें वितळविणें, पोलाद-माल तयार करण्यासाठी शुद्धीकरणाऱ्या खास तंत्रांचा अवलंब करणें, इ. विषयांवर अनेक शोध लावण्यांत आले होते.

---

### धोक्याच्या सांखळीचा दुरुपयोग

आगगाडींतील धोक्याची सांखळी ओढण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या १२ महिन्यांत ही संख्या ४०,००० वर गेली व यांपैकीं केवळ १% पेक्षाहि कमी प्रकरणीं सांखळी योग्य कारणास्तव वापरण्यांत आली होती.

---


# NOTICE

**BHOR STATE BANK LIMITED, BHOR.**

Notice is hereby given that the 14th Ordinary General Meeting of the Shareholders of Bhor State Bank Limited, will be held at the registered office of the Bank, at Bhor, Rajwada Chowk, Bhor, (Dist. Poona) at one P. M. (S. T.) on Monday the 31st March 1958 to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, and Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended 31-12-57.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To appoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,

Bhor, 23rd Feb. 1958. } Y. S. Joshi, Manager.

*N. B.*—The Share transfer books of the Bank will be closed from 24-3-58 to 7-4-58 (both days inclusive.)

# NOTICE

Notice is hereby given that 20th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank Ltd., will be held at the Head Office of the Bank at 93/2-A Budhwar Peth, Poona City on Thursday the 27th March, 1958, at 4 p. m. to transact the following business :—

1. To receive the Report of the Directors, and the Audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year 1957.
2. To declare a Dividend on Preference Shares.
3. To elect a Director in place of Shri. K. P. Joshi, who retires by rotation and is eligible for re-election and to consider, and if thought fit to pass the following resolution of which a special notice as required by section 281 of the Companies Act 1956, has been received by the Bank and the relative explanatory statement concerning which is annexed hereto as required by Section 173 of the said Act :—

   "Resolved that pursuent to the provisions of Section 281 and other applicable provisions (if any) of the Companies Act 1956, Shri. K. P. Joshi who has attained the Age of 72 years and who retires by rotation be and is hereby re-appointed as a Director of the Company and it is hereby specifically declared that the age limit for Directors prescribed under Section 280 of the said Act shall not apply to him".
4. To elect a Director in place of Shri. R. B. Girme who retires by rotation and is eligible for re-election.
5. To elect a Director in place of Mr. B. B. Walvekar who retires by rotation and is eligible for re-election.
6. To appoint auditors for the current year and fix up their remuneration.
7. To transact any other business with the permission of the Chairman.

By Order of the Board,

Poona, 8th Feb. 1958.
93/2A, Budhwar Peth,
Poona 2.

R. B. Salvekar,
N. N. Kshirsagar,
Managing Directors.

*Notes* :—(a) A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and a proxy need not be a member.

(b) The Transfer Books of the Bank will be closed from 15th March, 1958 to 31st March, 1958 both days inclusive.

## ANNEXURE TO THE NOTICE

Explanatory Statement as required by Section 173 of the Companies Act 1956.

To

The Shareholders of

The Bharat Industrial Bank Ltd.,

Dear Sir/Madan,

In conformity with the Companies Act 1956 which came into force on 1st April 1956, the following explanatory statement as required by Sec. 173 of the aforesaid Act, sets out all material facts relating to item 3 mentioned in the accompanying Notice dated 8th February 1958.

In respect of item No. 3, it is notified that Shri. K. P. Joshi who retires by rotation and is eligible for re-election has attained the age 72 years and hence he cannot be elected a Director of the Company except by a resolution in respect of which special notice has been given in accordance with the requirements of Section 190 and 281 of the Companies Act 1966. The Bank has received such a special notice from some membere notifying their intention to move the resolution as set out in the said item. Shri. K. P. Joshi has been a Director of the Board of this Bank since 1943 and is the Chairman for the last four years. He is a legal practitioner in Poona and has rendered valuable services to the Bank. It is in the interest of the Bank that he should continue to receive the benefit of his services as a member of the Board.

By Order of the Board,

Poona, 8-2-1958.

R. B. Salvekar,
N. N. Kshirsagar,
Managing Directors.

**के. सी. नियोगी राजीनामा देणार ?**— भारताच्या नियोजन समितीचे सतत सात वर्षें सभासद असलेले श्री. के. सी. नियोगी चालू महिन्याच्या अखेर समितीचा राजीनामा देणार असल्याचें समजतें. त्यांच्या मतानें, दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम वाजवीपेक्षा आधिक महत्त्वाकांक्षी असून सत्य परिस्थितीची दखल घेणारा नाहीं. त्यांच्या इतर सहकाऱ्यांचें मत मात्र असें नाहीं.

**सहकारी व्यापारासाठी संस्था**—देशांत सहकारी पद्धतीनें व्यापार करण्यासाठी एक मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन स्थापन करण्याचा विचार माझ्या मनांत घोळत आहे, असें मध्यवर्ती सरकारचे शेतकी मंत्री श्री. पंजाबराव देशमुख ह्यांनीं बोलून दाखविलें. ह्या संस्थेनें स्वतंत्रपणें काम करावें अशी त्यांची अपेक्षा आहे.

**दाढी करण्याचीं पातीं**—दाढी करण्याच्या पात्यांची देशांतील गरज वाढत्या प्रमाणांत देशांत तयार करण्यांत आलेल्या पात्यांनीं भागविली जात आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. भारतामधील कारखाने ६१·५ कोटी पातीं दरसाल करूं शकतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.